# सृष्टिज्ञान : ५० वर्षांपूर्वी
## (जुलै १९७३, वर्ष ४६वे, अंक ७, क्रमांक ५४७)

या अंकात एकूण अकरा लेख आहेत.

हरितनगरी–राघुनगरी हा डॉ. क. कृ. क्षीरसागर यांचा अंकाच्या स्वागतपर एकपानी लेख आहे. आमचे नाना ..... यांना सृष्टिज्ञानचे लेखक म्हणून ५० वर्षे झाली की! नाना .... आजही लिहिते आहेत व इतरांनाही लिहिते करीत आहेत!!!

दुसरा लेख आहे श्री. श्रीनिवास ताम्हनकर यांचा 'कोळ्याचे जाळे' शिर्षकाचा आहे. अंकाचे मुखपृष्ठावरही या लेखाचा ठसा आहे. स्थापत्य शास्त्राचा एक अजब नमुना असे लेखकाने म्हटले आहे. परंतु तपशील पाहता अभियांत्रिकी, पदार्थ विज्ञान, भूमिती, कौशल्य विज्ञान अशा अन्य अनेक शास्त्रांचाही समावेश कोळी आपल्या उपजत बुध्दिमत्तेमुळे करतो असे दिसते.

मोठ्या संख्येचा वर्ग अगदी सुलभ पध्दतीने काढण्याची पध्दत सी. बा. जोशी यांनी स.न.वि.वि. या लेखात दिली आहे. त्याचबरोबर द. ज. जोगळेकर, द. रा. कसरेकर यांचेही पत्रव्यवहार आहेत.

मराठी विज्ञान परिषद तर्फे आयोजित विज्ञानरंजन कथा स्पर्धा तसेच 'दूधसमस्या व विज्ञान' या विषयावरील निबंधस्पर्धेची माहिती त्यांचे कार्यवाह यांनी दिली आहे.

प्रा. राम पणदूरकर यांच्या लेखात एखाद्या प्रदेशाच्या सीमा वा सरहद्दी कशा ठरविल्या जातात यांची रंजक माहिती आहे. तसेच सीमा वा सरहद्दी यांना एव्हढे महत्व का दिले जाते याचा उहापोह थोडक्यात केला आहे.

नेहमीच्या वाचनीय व आकर्षक सदरात जेली मासा ही चित्रकथा प्रा. य. बा. राजे व श्री. चं. ह. पाटील यांनी विकसित केली आहे.

अभ्यासक्रमात बदल सुरु असून त्याचा आढावा श्री. रा. वा. केळकर यांनी घेतला आहे. त्यावेळी प्रथमच सर्वत्र एकच/समान पुस्तक ही संकल्पना राबविली गेली असे आढळते. खते म्हणजे हरितक्रांतीचे अग्रदूत हे स्पष्ट होते ते श्री. मा. वा. दहिफळे यांचे लेखातून श्री. व. दा. जोगळेकर यांनी प्राथमिक गणकयंत्र आपल्या मेंदूमध्येच असते, असे प्रतिपादन ''शरीरातील गणकयंत्र'' या आपल्या लेखात केले आहे.

श्री. निरंजन घाटे यांचा 'मानव, डायनोसॉरस व उत्क्रांती' हा लेख असे दर्शवितो की, उत्क्रांती हा विषय एकंदरीत वादाचाच आहे विशेषत: उत्क्रांतीला प्रगत दिशा कोणती धरायची हा कळीचा मुद्दा आहे हे समजते.

मानाचा मुजरा हा लेख प्रा. प्रभाकर सोवनी यांच्या नेहमीच्या सदरातला आहे. यात रॉबर्ट हूक, ग्रगॉर मेंडेल, व फ्रीडरीश बोहर यांच्या संशोधनाची माहिती आहे. तर द. ग. कोपरकर यांच्या गतिमान विश्व लेखात विश्वातल्या आश्चर्याची माहिती आहे.

◆

**विज्ञान वार्ताहर**